Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# आशा डांगे यांच्या 'परिघाबाहेर' कविता संग्रहामधील जाणिवा

**चोथे विनायक शिवाजीराव**
संशोधक विद्यार्थी

**प्रा.डॉ. सोनवणे ए. बी.**
संशोधक मार्गदर्शक
मालवांचल विद्यापीठ, इंदौर

आशा डांगे यांचा परिघाबाहेर हा कवितासंग्रह २०१८ साली प्रकाशित झाला. हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहामध्ये प्रगल्भ स्त्री जाणीवाची कविता आकारा आलेली आहे. त्यामुळे साहित्य निर्मिती करणे हे अपत्य जन्माला व त्यातून सुख व कष्ट दोन्हीची प्रचिती येते. याचा अनुभव त्यांनी आपल्या कवितेमध्ये अविष्कृत केलेला आहे. कविता ही कवयित्रीचे अनुभव विश्व असते. आणि ते अनुभव विश्व या कवयित्रींनी आपल्या लेखनामध्ये नोंदवलेले आहे. एकूण या कवितासंग्रहामध्ये ५८ कवितेचा समावेश आहे. दैनंदिन जीवनामध्ये जे जे विषय महत्त्वाची वाटते त्या विषयाला जगण्याला व अनुभूतीला सोबत घेऊन त्यांनी काव्य लेखन केले आहे. खरं तर कविता ही मानवी जीवनाच्या अनुभवाच्या आणि अवतीभवतीच्या परिसराला केंद्रभूत ठेवून अवतरत असते आणि त्याच प्रकारे आशा डांगे यांनी देखील या आपल्या पहिल्या कवितासंग्रहामध्ये मनातील हुंदके यांना वाट मोकळी करून दिलेली आहे. मराठवाड्यातील १९ ९० नंतर झालेल्या काव्य लेखनामधून पाण्याचे दुर्भिक्षीकरण मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसते. कारण मराठवाडा हा प्रदेश दुष्काळ सदृश्य प्रदेश असल्याने खऱ्या अर्थाने पाण्याची गरज या प्रदेशाला असल्याचे दिसून येते. मग तो पाणी किंवा पाऊस कसा पडतो याचे वर्णन कवयित्रींनी आपल्या काव्य लेखनात केले यासंदर्भामध्ये देशाविषयीचे असलेले प्रेम जन्म अवतीभवती घडणाऱ्या घडामोडी, विद्रोह माणुसकी मैत्रीत्व आई विषयी असलेले प्रेम मनाविषयी असलेली जागरूकता या गोष्टी या लेखनाच्या केंद्रबिंदू झालेल्या आहेत. नकळत अंतर्मनातली कविता देखील सहज उमटली जाते. विद्यार्थी दशेत असताना किंवा विद्यार्थ्यांच्या संबंधात दैनंदिन सोबत असताना परीक्षेचा असलेला विचार सण-उत्सवाच्या निमित्ताने दिवाळी स्त्रीचे असलेले जगणं तिची असलेली वेदना पत्नी म्हणून करावी लागणाऱ्या गोष्टी निसर्ग याविषयीचे चिंतन त्यांनी आपल्याला मांडलेला आहे. प्रामुख्याने एक गोष्ट महत्त्वाची वाटते ती अशी की गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री हत्या किंवा निर्भयासारखी प्रकरण माणसाला अस्वस्थ करतात आणि त्यामुळे मन हेलावून जाते. त्याचाही विचार अलीकडच्या काव्य लेखनामध्ये आलेला दिसतो. त्यातली महत्त्वाची जी कविता आहे. ती निर्भया नावाची ती कविता मला फार महत्त्वाची वाटते त्यात कवयित्री नोंदवितात.

"पोहोचलाच नाही
तिचा आवाज आमच्या

बंद दार खिडक्यांपर्यंत
ते काळेकुट्ट ढग
कचाकचा हसत
निर्लज्जपणे
राहिले बरसत
क्रूर पुरुषत्व
रितं करण्यासाठी
ती होता.r गेली निष्प्राण
तिच्या वेदना आणि आक्रोश आम्ही
रोजच्या बातम्यांतून चघळला"

या अर्थाने ही कविता आपल्यासमोर येते निर्भया घटनेच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने ही लेखणी अवतरली आहे. ही केवळ सर्वांना सर्वश्रुत आहे. म्हणून लेखन झाले परंतु अशा कित्येक घटना आपल्या अवतीभवती घडताना दिसतात पुरुष किती क्रूर झाला आहे. आणि तो आपले पुरुषत्व रीत करण्यासाठी किती लोकांचा बळी घेऊन आपली इच्छा आकांक्षा पूर्ण करतो आहे. याचं नेमकेपणाने भाष्य आशा डांगे यांनी या कवितेमध्ये केलेले आहे. खरंतर बाई पणाचे जीवन अत्यंत वाईट आहे. कोणताही पुरुष तिच्याकडे निर्मळ प्रांजळ दृष्टीने पाहत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून आज जवळपास ७५ वर्ष उलटले असले तरी समाजाची परिस्थिती आहे. तशीच आहे. या ठिकाणी स्त्री सुरक्षित नसल्याचे दिसते. तिला रात्री बे रात्री केवळ उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहिले जाते. हे समाजासाठी घातक आहे. हे घातक पण दूर करण्यासाठी समानतेची वागणूक देणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु पुरुष मात्र तिच्याकडे त्याच दृष्टीने आज देखील पाहतो आहे. तिची विवेचना ती मांडू पाहते आहे. तिचं जगणं ती समाजासमोर आणण्यासाठी धडपडते आहे. तरी देखील हा पुरुष नराधम तिच्याकडे केवळ भोगवस्तू म्हणून पहात असल्याने तिचे जीवन कवडीमोल झाले आहे. म्हणून निर्भयासारख्या घटना आज समाजात घडताना दिसतात भारताला संस्कृतीची दीर्घ परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्र तर संत महंतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा प्रदेश आहे. संतांनी समाजाला उपदेश पर काही विचार दिलेले आहेत. तरी देखील या महान अशा राज्यामध्ये या गोष्टी घडतायेत ह्या माणसाला अस्वस्थ करणारे आहेत. ह्या घडू नये म्हणून सर्वांनी प्रयत्न करणे अगत्याचे ठरते त्यातील बोलकी उदाहरण म्हणून निर्भया ही कविता आपल्याला पाहायला मिळेल. स्त्रीच हेच किंवा यापेक्षा अधिक जीवन प्रत्येक कवयित्री लेखनामध्ये मांडताना दिसते आणि म्हणून या कवितेच्या विचारातून शब्दातून स्त्रीचं असलेलं रूप या ठिकाणी दिसते पुढे कवयित्री लिहिते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

“उद्ध्वस्त करणाऱ्या
पावसापासून वाचण्याचा
असतो प्रयत्न आणि
मुलीचा गर्भ पाडण्यासाठी
एखाद्या कुबटलेल्या
गल्लीत शोधतो मग
अवैध गर्भपात केंद्र”

या प्रकारचं अतिशय अस्वस्थ करणारं चिंतन आशा डांगे आपल्या कविता लेखनातून मांडत राहतात समकालीन कालखंडामध्ये निर्माण होणारे प्रश्न आणि समस्या हे अस्वस्थ करणारे आहेत. बहुतां हा संभ्रमित अवस्था निर्माण करणार आहे. त्यामुळे प्रत्येक आई-वडील आपल्या मुलीची चिंता व्यक्त करून सुरक्षित जीवन जगण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करतो आहे. आजकाल निर्माण होणाऱ्या समस्या आणि प्रश्न या चिंताजनक आहे. कारण समकालीन कालखंडामध्ये अन्य अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे जो तो आपापल्या विचारातून चिंता व्यक्त करतो आहे. मध्यंतरीच्या कालखंडामध्ये निर्भया प्रकरण घडलं आणि त्या प्रकरणाच्या नंतर सगळा समाज अस्वस्थ झाला अतिशय चिमुकल्या मुलींच्या देहाची लक्तरे ओढण्याचा प्रयत्न येथील पुरुष मंडळी करताना दिसते. कारण आज महाराष्ट्राचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येईल की प्रत्येक ग्रामीण भागामध्ये असंख्य मुलं हे बगर लग्नाचे आहेत. मोठ्या प्रमाणामध्ये बेरोजगारीचे प्रमाण आहे. प्रत्येक मुलीच्या आई-वडिलांना असे वाटते की, आपला होणारा जावई हा नोकरी करणारा असावा किंवा त्याचा एक स्वतंत्र व्यवसाय असावा परंतु शिकून सोडून नोकरी मिळत नसल्याने हतबल झालेला सुशिक्षित वर्ग आज मोठ्या प्रमाणात बेरोजगारीला सामोरे जातो. आहे. आणि त्यामुळे या अशा भयग्रस्त समस्या निर्माण होऊन मोठ्या प्रमाणामध्ये अन्याय अत्याचार वाढतायेत या व अशा अनेक गोष्टींची दखल मराठवाड्यातील कवयित्रीने घेतल्याचे पाहायला मिळेल. कारण सम काळाच चिंतन मांडणं हे कवीचे लेखनिक रूप असते आणि ते अवतरण्यामध्ये किंवा अधोरेखित करण्यामध्ये या कवयित्री मोठ्या प्रमाणामध्ये प्रयत्न करताना दिसतात २००१ ते २०२० या कालखंडामध्ये लेखन करणाऱ्या मराठवाड्यातील कवयित्री हे अतिशय संवेदनशील पद्धतीने काव्य लेखन करताना पाहायला मिळतात. कारण या कवयित्री वेगवेगळ्या समाजाचं ठिकाणाचं आणि अवतीभवतीच्या परिसरातील चिंतन करणाऱ्या व आपल्या निरीक्षणातून लेखणी उमटविणारे आहेत. त्यामुळे ते लेखन काल्पनिक नसून वास्तव आहे. असेच आपल्याला दिसते कोणतीही वाङ्मय प्रकाराचे लेखन करताना लेखक ते आपल्या मनातून आपापल्या गोष्टी उलगडत जात असतो मात्र सध्याचा काल भयावह आहे. प्रत्येक माणूस आपलं रूप वेगवेगळ्या प्रकारे

वेगवेगळ्या घटनेच्या माध्यमातून समोर आणतो आहे. त्यामुळे आजची तरुणी वास्त्री सुरक्षित नसल्याचे निष्पन्न होते म्हणून सुरक्षेसाठी शासनाने पुढाकार घेऊन आपल्या माता भगिनींना सुरक्षित ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे हा भाव आशा डांगे यांच्या कवितेतून प्रकट झाल्याचे आपल्या लक्षात येईल कृष्णादिंतीचे वाढणारे प्रमाण अतिशय चिंताजनक असल्याने त्यावरही निर्बंध घातले पाहिजे ही भावना व्यक्त झालेली आहे. शिवाय या गोष्टीमुळे होणारा अन्य अत्याचाराचे प्रमाण कमी होऊन एक नवीन जीवन सुरक्षित जीवन खऱ्या अर्थाने पाहायला मिळेल. म्हणून ही कवयित्री एक व्यापक असे विषय घेऊन निर्भया सारखे प्रकार घडू नये या प्रकारचे आव्हान आपल्याला करते त्यांची याच संग्रहातील महत्त्वाची कविता म्हणजे चौकटी होय त्या कवितेत त्या आपल्या मनात दाटलेल्या भावनांचा महापूर व्यक्त करताना पाहायला मिळतात त्या लिहितात.

“परिघात जगणं परीघातच मरणं
परिघाबाहेरच्या दिशा तरी का आवडाव्या
झरोक्यातील कवडसे खुणावती मना,
मीच तरी दारे खिडक्या बंद का कराव्या
इतक्या चौकटी अंगवळणी पडाव्या”

स्त्रीच्या जीवनामध्ये असलेले जे काही बंधने आहेत. ती बंधने घातल्यामुळे होणाऱ्या व्यातना या दहा वर्णन करणाऱ्या आहेत. त्यामुळे इतक्या असलेल्या चौकटी हया नेहमीच स्त्रीच्या अंगवळणी पडलेले आहेत. नवरा गावी गेल्यानंतर फिरायला जाऊन आपली इच्छा-आकांक्षा पूर्ण करणाऱ्या महिला या समाजात दिसून येतात प्रत्येक बाई नवरा गावी गेल्यानंतर तिची इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हॉस्पिटलचे निमित्त करून बाहेर जाऊन आपला इच्छा आकांक्षाचा भाग पूर्ण करते. तेव्हा तिला तिची दमकुंडी आहे. ती दूर झाल्याची दिसते असंख्य बाया या नवऱ्याच्या माघारी आपलं रूप दाखवतात आपल्या नवऱ्याच्या माघारी मित्र-मैत्रिणींना बोलून आपलं मन हलकं करण्याचा प्रयत्न करतात. असे असले तरी तिला चौकटी बाहेर फिरू द्यावे तिच्या इच्छा आकांक्षांचा विचार करावा हे सदर लेखनामध्ये अधोरेखित झालेले आहे. आज समाजात मोठ्या प्रमाणामध्ये पती-पत्नीचे भांडणे होताना दिसतात. त्याचे एकमेव कारण म्हणजे पतीचा आदर न करणे आणि त्याच्या इच्छा आकांक्षाचा विचार न करणे त्यामुळे या गोष्टी अधिक वाढताना दिसतात स्त्रीवादी दृष्टिकोनातून विचार न करता पारंपारिक विचाराला सोबत घेऊन चालणाऱ्या महिलांचे प्रमाण समाजात कमी असल्यामुळे आणि पतीच्या कोणत्याच गोष्टी त्या पूर्ण न केल्यामुळे या प्रकारे निर्भयासारखे प्रकरण या ठिकाणी घडतात म्हणून परिघाबाहेर जाणं आणि तिथेच जगणं बाहेरच्या दिशा तिला खुणावत आहेत. नेहमी केवळ स्वप्न बघायचं आणि ते पूर्ण करायचं हा दृष्टिकोन असल्यामुळे या ठिकाणच्या पुरुषप्रधान

संस्कृतीने प्रत्येक स्त्रीला स्वातंत्र्य देणे अपेक्षित आहे. व त्या प्रकारचा अंगीकार देखील स्त्रियांनी करावा चौकटीच्या बाहेर राहून आपलं कौटुंबिक जगणं सुखा समाधानाचं करणं हे स्त्रीच्याच हातात असते आणि म्हणून डोळ्यातील आसवांना मोकळी वाट करून देण्याचा प्रयत्न सदर कवयित्री आपल्या लेखनातून करते सामाजिक शैक्षणिक आर्थिक राजकीय कौटुंबिक जीवनामध्ये आज स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभाग घेत आहेत. आणि या कार्याच्या माध्यमातून पुरुष किती वाईट प्रवृत्तीचे आहे. याचे दर्शन तिला अनुभवातून घडत असते पुरुषाविषयी ती केवळ काल्पनिक पातळीवर विचार करत नाही तर ती तिचं निरीक्षण नोंदवते आणि हे अस्सल अनुभूती असते त्याला वास्तवाची झालर असते त्यामुळे केवळ आरोप आणि प्रत्यारोप करून ती मोकळे होते असे नाही तर तिच्या दैनंदिन जीवनामध्ये वाटेला आलेला दाह ती आपल्या लेखनातून मांडत असते वर्तमान कालखंडामध्ये निर्माण झालेल्या समस्या ह्या कोणत्याही समाजाच्या केंद्र वरती आहेत. प्रत्येक स्त्री व पुरुष या घटनेने अस्वस्थ होता.ना दिसतो सातत्याने हे कर ते करू नको या भूमिकेमुळे स्त्री ही अतिशय वेदनादायी जीवन जगते आहे. परंतु आपल्या डोळ्याने पापण्यांनी आपणच किती फितूर व का सोसाव्या वेदना हा विचार ती नेहमी करते आहे. एका चौकटीच्या बाहेर जाऊन विचाराला व्यापकत्व प्राप्त करून ती समाजामध्ये उतरताना दिसते परिणामी स्त्रीला आजच्या काळात मोठ्या प्रमाणामध्ये वेदना सहन करावे लागतात कारण तिला असलेलं स्वातंत्र्य मिळत नाही वेदना प्रकट करते आहे. या व अशा अनेक गोष्टी कवयित्री आशा डांगे यांनी आपल्या काव्य लेखनात नोंदवलेले आहेत. समाजाचे संचित मांडण्याचा प्रयत्न या कवयित्री कडून झालेला आहे. या प्रस्तावनेमध्ये कवी व अभ्यासक डॉ.गोविंद गायकी स्पष्टपणे नोंदवतात

“लाडकी माझी लेक
मोठी होईल शिकून
चार चाकी गाडीतून येईल
थाटात साहेबीण होऊन”

या प्रकारचा आशावाद त्या आपल्या कवितेतून मांडतात. स्त्री जीवनातील दुःख वेदना याचे चित्रण करताना समाज व्यवस्थेवर बिनधास्तपणे कठोर प्रहार करून चौकट मोडून नाकारून परिघाबाहेर पडतात. ‘कात’ या कवितेत पुरुषाने स्त्री भोवती निर्माण केलेल्या पिढ्यानपिढ्या परिघातून बाहेर पडण्यासाठी आजची स्त्री मोठ्या प्रमाणामध्ये धडपड करताना दिसते. त्यामुळे तिची एक प्रकारची वेदना आपल्या काव्य लेखनातून मांडण्याचा प्रयत्न मराठवाड्यातील अनेक कवयित्रींनी केलेला आहे. या बिनधास्तपणे विचार करणाऱ्या स्त्रियांची खरंच आजच्या काळात गरज निर्माण झालेली आहे. असे आपल्याला ठामपणे म्हणता येईल.

त्यामुळे स्त्रीने शिकून मोठे व्हावे चाकुरीबद्ध विचाराला आळा बसावा आणि ती व्यापक रूप प्राप्त करू पाहते आहे. या प्रकारचा विचार सदर लेखनामध्ये आविष्कार झालेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आज मोठ्या प्रमाणात समाज शिक्षणासाठी धडपड करतो आहे. हा केवळ बहुजन समाज नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वच भारतीय समाजाला शिक्षण घेण्याच्या आव्हान केले होते परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचाराचा पुरस्कार खऱ्या अर्थाने बहुजन समाजाने केलेला आहे. आणि आज हा समाज इतरांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणामध्ये समाज परिवर्तनासाठी शिक्षण घेतो आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या विचाराचा पुरस्कार करणाऱ्या विचारात बदल झालेला पाहायला मिळतो जीवनाची वाट सुजलाम सुफलाम व्हावी यासाठी धडपडतो आहे. सामान्य माणूस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले विचारातून मार्ग क्रमांक करताना किती यातना सहन करावे लागले तरी तो या बदलासाठी शिक्षणच महत्त्वाचे आहे. या धारणेवर येऊन पोहोचलेला आहे. म्हणून सदर काव्य लेखनात देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून काही ओळी लिहिल्या गेलेल्या आहेत. माझी लेक जर शिकली तर मोठी होईल आणि मोठी झाली तर ती साहेबन होईल आणि चार चाकी गाडीतून फिरेल ही केवळ शक्य आहे. ते शिक्षणातूनच त्यामुळे शिक्षण हे सर्वांसाठी अनिवार्य अशी गोष्ट झालेली आहे. आणि या विचारातून आज मोठ्या प्रमाणात मुली देखील शिक्षण घेताना दिसतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषाच्या बरोबरीने महिलांनी शिक्षण घेतलं पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली होती. ती पूर्णत्वास जाताना दिसते मात्र असे असले तरी ग्रामीण भागातल्या एकूणच समाजाच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प स्वरूपाचे असल्याचे दिसते त्यामुळे खेड्यातील मुला-मुलींनी शिक्षणाची काच धरावी ही अपेक्षा देखील मराठवाड्यातील कवयित्रीच्या काव्य लेखनातून अधोरेखित झाले आहे. परिणामी समाजाला दिशादर्शक विचार देण्यासाठी साहित्य फार मौलिक कार्य करते त्यामुळे या लेखनातून दिशादर्शक विचाराला प्रधान्य आहे. असे आपल्या लक्षात येईल मराठवाड्यातील एकूण कविता ही मानवी विचाराला प्रगल्बम बनवण्याच्या दृष्टीने पुढे येथे आहे. व तशी ती महत्त्वाची आहे. कारण या भागात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे १९५० या साली डा. बाबासाहेब आंबेडकरांनी या ठिकाणी मिलिंद महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि महाराष्ट्रात आज मिलिंद महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणामध्ये कार्यरत आहेत. सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांनी या ठिकाणी शिक्षण घेतलेल्या दिसते. म्हणून तत्कालीन कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असलेली भूमिका ही अतुलनीय आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयानंतर या ठिकाणी मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले काळाची पाऊले ओळखून तत्कालीन कालखंडामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले हे कार्य फार महत्त्वाचे होते. तशी मराठवाड्याला एकूणच अर्थाने

फार मोठी परंपरा मिळालेली आहे. या परंपरेतून संतांनाही वजा करता येणार नाही संतांच्या विचारातून प्रबोधनातून मोठ्या प्रमाणामध्ये समाज जागृती झालेली आहे. अशी आपल्याला ठामपणे म्हणता येते सदर काव्य लेखनामध्ये देखील महापुरुषांच्या विचाराचा पुरस्कार केलेला दिसतो आणि एकूणच समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण किती महत्त्वाचे आहे. याचे प्रतिपादन या लेखनाच्या माध्यमातून्ा होते आहे. त्यामुळे केवळ लिहिणे हा भाग नसून आपल्या लेखनातून समाजाला दिशादर्शक विचार प्राप्त व्हावे या दृष्टीने देखील मराठी कविता महत्त्वाची आहे, असे आपल्या लक्षात येईल मराठवाड्याच्या भूभागाला जशी पुरुष लेखक साहित्य निर्माण करता आले तसेच स्त्री लेखिका कवयित्री देखील निर्माण करता आलेले आहेत. इस्त्री बोलू लागली आपले विचार प्रगट करू लागली आणि या विचाराच्या माध्यमातून समाज व्यापक विचारातून पाहू लागला आणि त्यामुळेच स्त्री शिकली तर किती प्रगती होऊ शकते याचे प्रत्येनंतर आपल्याला या कालखंडामध्ये पाहायला मिळते.. म्हणून कोणत्याही बदलासाठी व समाजाच्या उन्नतीसाठी घरातील पारंपरिकता नष्ट करण्यासाठी रूढी परंपरेला छेद देण्यासाठी शिक्षण खऱ्या अर्थाने महत्त्वाचे आहे. असे आपल्याला लक्षात येईल. त्याचबरोबर स्त्री शिक्षणाकडे देखील तितक्याच डोळसपणे पहावे लागेल तेव्हाच समाज बदलासाठी आपण प्रयत्नरत असो कारण ज्या राज्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण मोठे आहे. त्या राज्याचा विकास हा सर्वाधिक दृष्टीने झालेला दिसून येतो याही दृष्टिकोनातून शिक्षणाकडे बघणे महत्त्वाचे मानले जाते. म्हणूनच वरील ओळीतून जो स्त्रीविषयक शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. तो अनन्यसाधारण स्वरूपाचा वाटतो. खऱ्या अर्थाने आशा डांगे यांनी आपल्या काव्य लेखनातून वेगवेगळ्या विषयावर चिंतनशील विचाराचे अभिव्यक्ती केली आहे, असे आपल्याला म्हणता येईल. त्यांच्या काव्य लेखनामध्ये वेगवेगळ्या दृष्टीने विषय प्रतिपादित झाले आहे आणि हा विचार केवळ स्त्री आणि पुरुष या संबंधाचा नसून आपल्या अवतीभवतीचे असणार जीवन आपली संस्कृती रूढीपरंपरेमध्ये देखील विचाराला प्रवृत्त करणार आहे. म्हणून ही कविता कधी डोळ्यात पाणी आणते तर कधी आस्वांना मोकळी वाट करून देत असताना प्रगल्भ विचाराची पेरणी देखील करते आहे. समाज व्यवस्था बदलली पाहिजे हा दृष्टिकोन ठेवून मार्गक्रमण करणे या कवयित्रीने पसंत केलेले आहे. या दृष्टीने देखील या लेखनाकडे आपल्याला पाहावे लागते भिजव सारा गाव या कवितेमध्ये कवयित्री लिहिते डोळ्यातील पाण्यान रे कशी मीटल तहान तुझीच रे लेकरे सारे का कोपलास असा कशी रे पहावते तुला आमची दशा या प्रकारचा भाव या लेखनातून व्यक्त झालेला आहे. खरं तर हे निसर्गाच देव दैवताच वर्णन आहे. परंतु सर्वसामान्य पासून असामान्य पर्यंत समाज व्यवस्थेत सजीव असणाऱ्यांना पाण्याची किती गरज आहे. त्याशिवाय त्याच्या जीवनाला कुठलेच स्थान प्राप्त होत नाही हे देखील सांगायला कवयित्री विसरलेली नाही हे निर्मिका, देवा तुला विनवणी आहे की, जोपर्यंत तू पडणार नाहीस (पावसाची

उपमा) तोपर्यंत या लेकराची तहान भागणार नाही आणि ही लेकरे तुझीच आहे. म्हणून तरी तू आमची दशा करू नकोस तू आमची हाक मान्य करून पाणी उपलब्ध करून द्यावे म्हणून ही विनंती कवयित्री सातत्याने विनंती करते आहे. घोटभर पाण्याने मानवी जीवन सुखावत नसते तर त्यासाठी पाण्याची अत्यंत गरज असते हे व्यक्त करायला देखील कवयित्री विसरत नाही शिवाय मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचे दुर्भिक्षीकरण असल्याने पाण्याची वानवा सातत्याने या ठिकाणी जाणवते आहे. आणि हे पाण्याचं दुर्भिक्षकरण नोंदवण्यात कवयित्री कमी पडलेली नाही चौफेर आकलन असणारी कवयित्री नैसर्गिक वर्णनाला देखील एक वेगळ्या उंचीवर मांडण्याचा प्रयत्न करते आहे. आणि हेच खऱ्या अर्थाने या लेखनाचे यश म्हणावं लागेल.

**संदर्भ**

१. रसाळ सुधीर काही मराठी कवी जाणिवा आणि शैली जनशक्ती वाचक चळवळ पुनर्मुद्रण आवृत्ती २०२२
२. स्त्रीवादी मराठी साहित्य https://vishwakosh.marathi.gov.in/23281/
३. डांगे आशा, तना मनाला चिंब करतो ही
४. डांगे आशा, परिघाबाहेर